भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानूमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक २१.१०.२०२० ते २५.१०.२०२०)

| अंक ८३/२०२० | | | | | | | दिनांक २०.१०.२०२० | | कालावधी ५ दिवस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१३/१०/२०२० ते १९/१०/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामानाचे घटक | | पूढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानूमान (वैधता २१/१०/२०२० ते २५/१०/२०२० पर्यंत) | | | | |
| १३/१० | १४/१० | १५/१० | १६/१० | १७/१० | १८/१० | १९/१० | दिनांक | | २१/१० | २२/१० | २३/१० | २४/१० | २५/१० |
| ०.० | २७.२ | २७.६ | ४१.२ | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | | २६ | २० | १९ | ९ | ३ |
| ३३.० | ३३.० | २६.५ | ३०.० | ३१.० | ३२.५ | ३२.५ | कमाल तापमान (अं. से) | | ३१ | ३५ | ३४ | ३२ | ३६ |
| २३.५ | २३.५ | २२.० | २३.५ | २३.५ | २२.० | २२.० | किमान तापमान (अं. से) | | २४ | २४ | २४ | २३ | २४ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ७ | ५ | ८ | ६ | ७ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | दुपार | | | | | | |
| ९५ | ९६ | ९८ | ९८ | ९८ | ९३ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | | ९५ | ९४ | ९५ | ९५ | ९५ |
| ८५ | ९३ | ९० | ७१ | ७१ | ७२ | ६५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ७२ | ७५ | ७६ | ७६ | ५६ |
| ०.० | ०.१ | ०.१ | ०.५ | ०.६ | ०.३ | ०.२ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ००६ | ००४ | ००६ | ००६ | ००५ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वोत्तर/ आग्नेये कडे | पुर्वोत्तर/ आग्नेये कडे | पुर्वे कडे | पुर्वे कडे |
| स्थिर | स्थिर | स्थिर | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर / नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी)न्य | १/०६/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ४७०४.८ | ४७०१.६ | ९६.० |

| | |
|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक २१ ते २५ ऑक्टोबर, २०२० या कालावधी दरम्यान दिनांक २१ ऑक्टोबर रोजी काही ठिकाणी मध्यम स्वरुपाच्या, दिनांक २२ ऑक्टोबर रोजी बहुतांश ठिकाणी मध्यम स्वरुपाच्या, दिनांक २३ ऑक्टोबर रोजी ब-याच ठिकाणी मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची तर दिनांक २४ व २५ ऑक्टोबर रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. त्याचबरोबर तापमानात काही ब-याच अंशी वाढ होऊन हवामान आर्द्र व पुर्णतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे. |
| इशारा | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक २१ ते २३ ऑक्टोबर या कालावधी दरम्यान सोसाट्याचा वारा, विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह पाऊसाची शक्यता आहे. त्याचबरोबर दिनांक २२ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे असा ईशारा प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून जारी करण्यात आलेला आहे. |
| सर्वसाधारण कृषि सल्ला | गेल्या आठवड्यामध्ये मध्यम स्वरुपाचा पाऊस होता तसेच येत्या आठवड्यामध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. त्याचबरोबर तापमानामध्ये वाढ संभवत असल्यामुळे सदर हवामान बि रुजण्यास पोषक आहे त्यामुळे वांगी, मिरची, भेंडी ई. फळभाज्यांची तसेच कलिंगड व खरबुज ई. वेलवर्गिय फळांची टोकणी करावी. |
| संक्षिप्त संदेश सल्ला | पुढिल ३ दिवसांमध्ये विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह पाऊसाची शक्यता असल्याने भात पिकांची कापणी पाऊसाचा अंदाज पाहूनच करावी. |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | हळव्या जातीः- कापणी<br><br>निम गरव्या व गरव्या जातीः- दाणे भरणे | गेल्या आठवड्यामध्ये मध्यम स्वरुपाचा पाऊस होता तसेच पुढील पाच दिवसांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>पुढील ३ दिवसांमध्ये मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता लक्षात घेता कापणीस तयार झालेल्या भात पिकांची कापणी पाऊसाचा अंदाज पाहूनच करावी.<br>भात पिक काढणीयोग्य झाले असल्यास कापणी पुर्वी ८ ते १० दिवस खाचरातील पाणी काढुन देण्याची व्यवस्था करण्यात यावी. कापणी करण्याच्या ८ दिवस अगोदर भातावर कोणतेही किटकनाशक/बुरशीनाशक फवारु नये वा धुरळणी करु नये.<br>जिल्ह्यात भात पिक कापणीसाठी तयार झालेले आहे. ज्या ठिकाणी भात पिक काढणीस तयार झाले असेल त्याठिकाणचे भात सकाळ ते दुपार या वेळेत जमिनीलगत कापुन घ्यावे.<br>कापणी केलेल्या भात पिकाची लागोलाग मळणी/झोडणी करुन धान्य कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळवण्यास ठेवावेत.<br>भात कापणीसाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या वैभव विळ्याचा वापर करावा जेणेकरुन भात जमिनीलगत कापले जाईल.<br>भात पिकाची मळणी/झोडणी केल्यानंतर पिकाच्या पेंढ्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी. जेणेकरुन त्या पेंढ्या पावसात भिजणार नाहीत व जनावरांस चांगल्या चा-याची उपलब्धता होईल. |
| नागली (नाचणी) | कापणी | पुढील ३ दिवसांमध्ये मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता लक्षात घेता कापणीस तयार झालेल्या नागली पिकाची कापणी पाऊसाचा अंदाज पाहूनच करावी.<br>जिल्ह्यात नागली पिक कापणीसाठी तयार झालेले आहे. ज्या ठिकाणी नागली पिक काढणीस तयार झाले असेल त्याठिकाणी नागली पिकाच्या लोंब्या सकाळ ते दुपार या वेळेत विळ्याच्या सहाय्याने कापुन घ्याव्यात.<br>कापणी केलेल्या नागली पिकाची लागोलाग मळणी करुन धान्य कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळवण्यास ठेवावेत. |
| भुईमुग | शेंगा | जिल्ह्यामध्ये भुईमुग पिक हे शेंगांची वाढ होण्याच्या अवस्थेत आहे. तसेच येत्या ५ दिवसामध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता भुईमुग पिकात पाणी साचुन राहीले असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |

| | | |
|---|---|---|
| आंबा | नवीन पालवी | गेल्या आठवड्यातील पाऊसामुळे नविन पालवी आलेली आंब्याची पाने फाटली असतील अश्या ठिकाणी करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव आढळुन आल्यास आवश्यकतेनुसार प्रोपीनेब ०.२% (२० ग्रॅम/१० लि. पाणी) किंवा थायफिनेट मिथील ०.१% (१० ग्रॅम/१० लि. पाणी) किंवा कार्बनडॅन्झिम ०.१% (१० ग्रॅम/१० लि. पाणी) यापैकी एका बुरशीनाशकाची आवश्यकतेनुसार फवारणी करावी.<br>आंब्यामध्ये नवीन पालवी आली असल्यास त्या पालवीचे शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणाारी अळी, आणि पाने खरवडणारा भुंगा या कीडींपासून अवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी 25 टक्के प्रवाही डायमिथोएट 12 मिली किंवा 36 टक्के प्रवाही मानोक्रोटोफॉस 11 मिली प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.<br>येत्या ५ दिवसामध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता आंबा बागेत पाणी साचुन राहीले असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>पॅक्लोब्युट्राझॉल (कल्टार) दिलेल्या झाडांचे बुंधे व त्याभोवतालचा भाग बेणणी करुन अथवा ग्रामोक्झोन हे तणनाशक फवारुन तणविरहीत ठेवावेत.<br>पावसाची उघडझाप, तापमानातील वाढ तसेच ढगाळ वातावरणामुळे आंब्यामध्ये नवीन पालवी आली असल्यास त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणाारी अळी आणि मिजमाशीपासून अवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी 25 टक्के प्रवाही डायमिथोएट 12 मिली किंवा 36 टक्के प्रवाही मानोक्रोटोफॉस 11 मिली प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.<br>पावसाची उघडझाप, तापमानातील वाढ तसेच ढगाळ वातावरणामुळे नविन लागवड केलेल्या आंबा कलमांवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास नियंत्रणासाठी नविन येणा-या पालवीवर आवश्यकतेनुसार प्रोपीनेब ०.२% (२० ग्रॅम/१० लि. पाणी) किंवा थायफिनेट मिथील ०.१% (१० ग्रॅम/१० लि. पाणी) किंवा कार्बनडॅन्झिम ०.१% (१० ग्रॅम/१० लि. पाणी) यापैकी एका बुरशीनाशकाची आवश्यकतेनुसार फवारणी करावी.<br>फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| काजु | - | येत्या ५ दिवसामध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता काजु बागेत पाणी साचुन राहीले असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मळ्याच्या क्षेत्रातील काजु बागेतुन अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>मोठया काजू बागेमध्ये वाढलेले झाडे झुडपे व तण काढून बागेची स्वच्छता करून घ्यावी.<br>ढगाळ पाऊसाळी हवामानामुळे काजुच्या कोवळ्या पालवीवर रोगाचा प्रादुर्भाव दिसुन येण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी पाऊसाची उघडीप असताना १% बोर्डो मिश्रणाची किंवा कार्बनडॅन्झिम १२% + मॅन्कोझेब ६३% या संयुक्त बुरशीनाशकाची १० ग्रॅम/१० लि. पाण्यात मिसळुन फवारणी करावी.<br>जिल्हयामध्ये काजु बागांना नविन पालवी येत असुन पावसाची उघडझाप, तापमानातील वाढ तसेच ढगाळ वातावरणामुळे काजु बागायतदारांनी ढेकण्या किडीच्या प्रादुर्भाव होवू नये म्हणुन जागरुक रहावे, प्रादुर्भाव आढ़ळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि.ली. किंवा लम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ६ मि.ली. १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ़ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| नारळ | फळ विकास | येत्या ५ दिवसामध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता नारळ बागेत पाणी साचुन राहीले असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| सुपारी | फळ विकास | येत्या ५ दिवसामध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता सुपारी बागेत पाणी साचुन राहीले असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>सुपारीवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये 1 टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| भाजीपाला | फळ धारणा | गेल्या आठवड्यातील मुसळधार स्वरुपाच्या पाऊसामुळे जिल्हयातील ब-याच ठिकाणी भाजीपाला पिकामध्ये पाणी साचुन राहीले असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| दुभती जनावरे | - | दिनांक २१ ते २३ ऑक्टोबर रोजी सोसाट्याचा वारा, विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने विजांच्या बचावापासुन शेतक-यांनी शेतामध्ये कामे करताना सावधानता बाळगावी. तसेच चारावयास सोडलेल्या दुभत्या जनावरांचे विजापासुन संरक्षण करण्यासाठी दुभती जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावी. |

टिप - पुढिल ५ दिवसांसाठी ब-याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने पावसाची उघडीप पाहुनच किटकनाशकांची व बुरशीनाशकांची फवारणी करावी. फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा.

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| | |
|---|---|
| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ऑफिसर<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |